International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.8 No.2 Nov – Dec 2020

# ग्रामसभेच्या कार्याबाबत ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांची उदासीनता

**डॉ. योगीराज. एस .उरकुडे.**
राज्यशास्त्र विभाग, भगवंतराव कला महाविद्यालय, सिरोंचा.
Corresponding Author: **डॉ. योगीराज. एस .उरकुडे.**

**प्रस्तावना:**

ग्रामसभा ही संकल्पना भारतात नवीन नाही. प्राचीन काळापासून ग्रामसभेचे अस्तित्व आढळते. ग्रामसभेस इंग्रजीत व्हिलेज कौन्सिल असे म्हणतात महाराष्ट्रात 1958 सन ग्रामपंचायतीचा कायदा झाला आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम 186 ( 1) अन्वये ग्रामपंचायत असलेल्या प्रत्येक गावात ग्रामसभा स्थापन करण्याचे वैधानिक बंधन शासनावर आहे. आपल्या देशाच्या राज्यघटनेत 1992 ला 73 वी घटनादुरुस्ती झाली या दुरुस्तीनुसार भारतात पंचायती राज पद्धती अनिवार्य होऊन त्यातील प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभा सुरू झाली. ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारिणी आहे म्हणून ग्रामसभेच्या संदर्भात ग्रामपंचायत ही एक जबाबदार संस्था ठरते. ग्रामसभेत 1992 च्या 73 व्या घटनादुरुस्तीनुसार संविधानिक दर्जा प्राप्त झालेला आहे या ग्रामसभेत ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व मतदार नागरिकांचा समावेश असतो लोकशिक्षण लोक नियंत्रण आणि लोकजागृती साध्य करण्यासाठी ग्रामीण स्तरावर ग्रामसभेला विशेष महत्त्व आहे गावाच्या विकास कार्यात ग्रामसभा अतिशय उपयुक्त ठरते कारण ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामस्थांना विविध विकास उपक्रमात सहभागी करून घेता येते. ग्रामसभा ही ग्रामपंचायतच्या सत्तेचे उगमस्थान आहे. आजच्या काळातील प्रतिनिधी शासन पद्धतीच्या अथवा अप्रत्यक्ष लोकशाहीच्या युगात ग्रामसभा म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीचा अभिनव प्रयोग होय . भौगोलिक आणि लोकसंख्यात्मक दृष्ट्या विशाल आकार असणाऱ्या भारतात ग्रामसभा आपल्या अधिकार आणि कार्याबाबत जागृत झाल्या तर प्रत्यक्ष लोकशाहीचा अभिनव सोहळा अभ्यासण्यासाठी आणि बघण्यासाठी देश विदेशातील राजकीय अभ्यासक भारतातील ग्रामसभांना भेट देतील.

**ग्रामसभेची रचना**

महाराष्ट्रात 1958 च्या ग्रामपंचायती कायद्यानुसार ग्रामसभांना मान्यता देण्यात आली होती. परंतु 1992 ला झालेल्या 73 व्या घटनादुरुस्तीने तिला घटनात्मक दर्जा मिळाला. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे

सदस्य असतात. गावातील 18 वर्षे पूर्ण करणारा प्रत्येक मतदार हा ग्रामसभेचा सभासद असतो. ग्रामसभेला निवडणूक नसते. सैद्धांतिकदृष्ट्या ग्रामसभा ही विधानसभा आणि लोकसभेची जननी आहे असे म्हणता येईल कारण जनतेचे सार्वभौमत्व तसेच कायदेमंडळ म्हणजे संसदेचे सार्वभौमत्व या तत्त्वाचे पहिले उगमस्थान ग्रामसभा हेच आहे.

**ग्रामसभेची बैठक आणि ग्रामसभेची संख्या**

ग्रामसभेची बैठक बोलाविण्याचा अधिकार सरपंचाला असतो. ग्रामसभेची बैठक बोलाविणे हे सरपंचावर बंधनकारक झाले आहे. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंचाला ग्रामसभा बोलाविण्याचा अधिकार प्राप्त होतो. ग्रामपंचायतच्या एका आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान सहा बैठका बोलवाव्या लागतात. ग्रामसभा आयोजित न करण्याबाबत जर सरपंच किंवा उपसरपंच हे दोषी आढळल्यास त्यांना पदावर राहण्याबाबत अपात्र ठरेल अशी वैधानिक तरतूद करण्यात आली आहे ग्रामसभा न बोलविण्यामध्ये ग्रामसेवक जबाबदार आहे असे आढळल्यास त्याला नोकरीतून निलंबित केले जाते.

**ग्रामसभेची गणसंख्या**

ग्रामसभेची बैठक होण्यासाठी जी आवश्यक सभासद संख्या लागते तिला गणसंख्या म्हणतात ग्रामसभेच्या बैठकीसाठी ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण मतदारांपैकी 15 टक्के किंवा 100 यापैकी जी संख्या कमी असेल तेवढे किमान मतदार हजर असणे आवश्यक असते ग्रामसभेसाठी गणपूर्ती आहे किंवा नाही हे तपासण्याचा अधिकार ग्रामसभेचे अध्यक्ष ला म्हणजे सरपंचाला असतो.

**ग्रामसभेचे अधिकार व कार्य**

राज्याच्या विधानसभेसारखे कार्य ग्रामसभेने गावासाठी करावे या अपेक्षेने ग्रामसभेचे अधिकार वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मध्ये सुधारणा करून 16 ऑक्टोबर 2002 च्या अध्यादेशानुसार ग्रामसभेच्या अधिकारात वाढ केली आहे.

**ग्रामसभेचे अधिकार पुढील प्रमाणे आहेत**

१) ग्रामपंचायतच्या विकास कार्यक्रमांना मान्यता देणे.

२) शासनाच्या विकास योजनांसाठी लाभधारकांची निवड करणे.

३) ग्रामपंचायतीला मार्गदर्शक सूचना करणे.

४) मागील ग्रामसभेतील कार्याचा वृत्तांत वाचून दाखविणे व त्याला मंजुरी देणे.

५) ग्रामपंचायतीच्या वार्षिक लेखा अहवालास मान्यता देणे.

६) ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाचे वाचन करणे.

७) ग्रामपंचायतीने चालू वर्षात केलेल्या विकास कार्यक्रमांचा आढावा घेणे.

८) पुढील वर्षासाठी ग्रामपंचायतीला कराव्या लागणाऱ्या विकास कार्यक्रमांची दिशा निश्चित करणे.

९) ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या गैरप्रकारासंबंधीचा अहवाल गटविकास अधिकाऱ्यास देणे.

१०) ग्रामपंचायतीवर नियंत्रण ठेवणे.

११) राज्य सरकारने वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे.

१२) पुढील ग्रामसभेच्या दिनांक, वेळ व ठिकाण अगोदरच्या सभेत निश्चित करणे.

१३) ग्रामपंचायतीशी विचार विनिमय करून ग्रामविकास समित्या गतीत करणे.

**ग्रामसभेचे स्थान व महत्त्व**

गावाच्या विकासाचे सर्व निर्णय ग्रामसभेत होत असतात विकास योजनांची अंदाजपत्रक तयार करणे त्यास मान्यता देणे तसेच विविध योजनांचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार ग्रामसभेला मिळाले आहे .त्यामुळे ग्रामसभेचे महत्त्व वाढलेले आहे. ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांना आणि ग्रामसभेच्या सदस्यांना म्हणजे ग्रामस्थांना डोळसपणे जागरूकपणे काम करावे लागणार आहे. ग्रामस्थांना जागृत करण्यासाठी गावातील पुढाऱ्यांनी, समाजसेवकांनी , शासकीय अधिकाऱ्यांनी व्यापक प्रयत्न करून समाजात जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. तरच आर्थिक विकास साधण्याबरोबरच सामाजिक क्रांतीचे ध्येय ग्रामसभा जागृत झाल्यास साध्य होऊ शकेल.

**ग्रामसभेच्या कार्याबाबत जनता व ग्रामपंचायत सदस्यांच्या उदासीनतेची कारणे**

१) ग्रामसभेच्या बैठकीची सूचना लोकांना वेळेवर मिळत नाही.

२) ग्रामसभेच्या बैठका शेतीच्या कामाच्या काळात घेतल्या जातात.

३) सरपंच उपसरपंच व शासकीय अधिकारी ग्रामसभा घेण्यास उत्सुक नसतात त्यांना जनतेच्या आरोपाची व टीकेची भीती वाटते.

४) ग्रामसभेत ग्राम विकासाच्या प्रश्नावर चर्चा करणे ऐवजी वैयक्तिक द्वेषातून, गटबाजीतून गटबाजीतून अपशब्द बोलणे अपमानजनक शब्दांचा वापर करणे ,बदनामीकारक बोलणे यामुळे ग्रामसभेत भांडण - तंटे ,हाणामारी सुद्धा होतात. अनेकदा ग्रामसभांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होते.

५) ग्रामसभेत ग्रामविकासाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली जात नाही.

६) सार्वजनिक हिताचे प्रश्नांवर ग्रामसभेत नागरिक गांभीर्याने चर्चा करत नाही. अशा ग्रामसभांमध्ये सहभागी होण्याचे टाळतात .

७) ग्रामसभेसाठी देण्यात येणारा वेळ विनाकारण व्यर्थ जाई अशी ग्रामस्थांची भावना भूमिका आहे त्यापेक्षा ते घरीच राहणे पसंत करतात.

८) ग्रामसभेच्या अधिकार व कार्याबाबत जनतेचे अज्ञान आहे ग्रामसभेची सत्ता व अधिकाराने ते प्रभावित झाले नाहीत.

९) गट ग्रामपंचायत अंतर्गत गावात ग्रामसभेबाबत ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांची अनास्था आहे. वेळ मोलमजुरीचे पैसे वाया जातील अशी त्यांची समाज असते.

१०) ग्रामसभेची सूचना दवंडीद्वारे देऊन त्याची लोकांना माहिती देणाऱ्या कोतवालाचे पद अनेक गावात रिक्त आहे त्यामुळे ग्रामपंचायतीच्या अंतर्गत सर्व गावात दवंडी देण्यास टाळाटाळ केली जाते.

११) गावात असणाऱ्या गटबाजीमुळे ग्रामसभेत होणारी भांडणे त्यामुळे पोलीस संरक्षणात ग्रामसभा घेतल्या जातात. ग्रामसभेतील पोलिसांची उपस्थिती ग्रामसभेतील सदस्यांच्या गैरहजेरीचे एक कारण ठरत आहे. १२) व्यक्तिगत लाभाच्या योजनांवर ज्या ग्रामसभेत चर्चा होणार असते त्या ग्रामसभेत महिला पुरुष व युवकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर असली तरी त्यात गटबाजी उफाळून आल्याचे दिसून येते. संख्याबळाच्या आधारावर आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी कधी कधी अनैतिक मार्गाचाही अवलंब केला जातो नागरिकांनी आपल्या बाजूने हात उंचावावे यासाठी दारू आणि पैशाचेही वाटप केले जाते. त्यामुळे गावात अशांतता तणाव व कलूषित वातावरण काही काळ पर्यंत कायम राहते.

**ग्रामसभेचे मूल्यमापन**

ग्रामसभा ही ग्रामपंचायत प्रत्येक गावासाठी ग्रामसभेची तरतूद करण्यात ग्रामसभेला वैधानिक दर्जा प्राप्त झाला तरीपण ग्रामस्थांच्या स्वार्थी प्रवृत्तीत झालेली वाढ, संधी साधूपणा, हेवे दावे, द्वेष ,व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, महिलांना दुय्यम मानण्याची प्रवृत्ती, जातीवाद ,शिक्षणाचे कमी प्रमाण, राजकीय अनास्था व अनभिज्ञता, सक्षम महिला नेतृत्वाचा अभाव, राजकारणाबद्दल वाईट दृष्टिकोन अशा अनेक कारणांनी ग्रामीण जनता व ग्रामपंचायत सदस्य हे ग्रामसभेबाबत उदासीन असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) रा. ज. लोटे, "भारतातील स्थानिक स्वशासन", पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

२) अ. ना. कुलकर्णी, भारतीय स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. श. गो. देवगावकर, पंचायती राज व सामूहिक विकास, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) डॉ. गिरबीरसिंह राठोड, भारत मे पंचायती राज, पंचशील प्रकाशन, जयपुर